# कुलगुरूसाहेब, जरा हे वाचा!

## बोगस महाविद्यालय प्रकरण

## चौकशी समितीचे गौडबंगाल



(अजित पाटील)

पुणे, दि. १८ (प्रतिनिधी)- पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांचे माजी कार्यकारी सहायक बाळासाहेब नाईक यांचे मांडवगण फराटा या गावी कोणतेही महाविद्यालय नव्हते आणि नाही, असा जावईशोध चौकशी समितीने लावला आहे. मग महाविद्यालय नसताना नाईक यांनी माहितीपत्रक कसे काढले? अशा स्वरूपाचे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत, कुलगुरूसाहेब त्यांची उत्तरे आपण देणार का?

शिरूर तालुक्यातील मांडवगण फराटा येथे नाईक गेल्या तीन वर्षांपासून कै. हिराबाई दयाराम नाईक, कला व वाणिज्य महाविद्यालय या नावाने महाविद्यालय चालवत होते. पुणे विद्यापीठाची किंवा महाराष्ट्र शासनाची मान्यता नसताना 'पुणे विद्यापीठाशी संलग्न' असल्याचे महाविद्यालयाच्या माहिती पत्रकात म्हटले आहे. १२ जून २००५ रोजी (रविवार) महाविद्यालयाचे उद्‍घाटन नाव्हरा येथील (पान ११ पहा) »



महाविद्यालयाच्या नावावर आलेले दूरध्वनी बिल.

## कुलगुरूसाहेब, जरा हे वाचा

(पान १ वरून) घोडगंगा सहकारी साखर कारखान्याच्या तत्कालीन संचालिका लतिकाबाई आनंदराव जगताप (वराळे) यांच्या हस्ते दुपारी एक वाजता झाले होते.

'श्री वाघेश्वर एज्युकेशन ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने कै. सौ. हिराबाई दयाराम नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय, मांडवगण फराटा, ता. शिरूर, जिल्हा पुणे येथे जून २००५ पासून सुरू होत आहे. विद्यादेवतेला दैवत मानून सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी समाजातील सर्व थरांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे, या मुख्य हेतूने महाराष्ट्र शासन व पुणे विद्यापीठ यांच्या परवानगीने या महाविद्यालयाची सुरुवात होत आहे. जून २००५ पासून महाविद्यालयामध्ये पुणे विद्यापीठाच्या कला व वाणिज्य विद्याशाखेचे प्रथमवर्ष अभ्यासक्रमाचे वर्ग सुरू होत आहेत. याच अभ्यासक्रमासोबत विद्यार्थ्यांना काही व्यावसायिक शिक्षण मिळावे यासाठी महाविद्यालयात व्यावसायिक अभ्यासक्रमही सुरू करण्याचा मानस आहे.....' असे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब नाईक यांनी माहिती पत्रकाच्या प्रास्ताविकात म्हटले आहे. प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी विद्यार्थी महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाची बारावीची परीक्षा इंग्रजी विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे, अथवा पुणे विद्यापीठाने मान्य केलेल्या अन्य विद्यापीठाची अथवा मंडळाची परीक्षा इंग्रजी विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे (उदा. डी. एड.), असेही माहिती पत्रकात नमूद केले आहे. प्रवेश घेताना सादर करावयाची कागदपत्रे, नियम व अटी, ग्रंथालयाचे नियम आदी तपशील माहिती पत्रकात आहे. माहिती पत्रकाच्या मुखपृष्ठावरच 'पुणे विद्यापीठाशी संलग्न' तसेच 'स्थापना: जून, २००५' असे छापले आहे.

या बोगस महाविद्यालयासंदर्भात सर्वप्रथम दैनिक 'प्रभात'मध्ये वृत्त प्रसिद्ध झाले होते. दौंड तालुक्यातील वरवंड येथील दिवेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाशी (महाविद्यालय क्रमांक १०८) संधान साधून कै. हिराबाई नाईक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रवेश या महाविद्यालयात दाखविले जात होते. त्यामुळे कै. हिराबाई नाईक महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दिवेकर महाविद्यालय हे परीक्षा केंद्र असायचे. या विद्यार्थ्यांना विद्यापीठातर्फे रितसर गुणपत्रिकाही दिल्या जायच्या.

कुलगुरू डॉ. जाधव यांनी मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य गोसावी आणि लोणावळा येथील महाविद्यालयाचे प्रा. संजय माळी यांची या बोगस महाविद्यालयासंदर्भात चौकशी समिती नेमली होती. या समितीने तब्बल ५० दिवस 'संशोधन' करून मांडवगण फराटा या गावात कोणतेही महाविद्यालय नव्हते आणि नाही, असा जावईशोध लावला. शिवाय गावात काही ज्येष्ठ नागरिक सेवाभावी वृत्तीने वर्ग चालवित होते, असे नमूद करून अकलेचे तारेच तोडले. महाविद्यालयासंदर्भात बातम्या छापून आल्यानंतर नाईक यांनी रातोरात रंगरंगोटी करून गावातून महाविद्यालयच गायब करून टाकले, त्यामुळे समितीच्या हातात काही लागण्याची शक्यता नव्हती. समितीला महाविद्यालयाचे साधे माहितीपत्रकही मिळविता आले नाही.

### समितीसाठी आणखी काही माहिती

- महाविद्यालयाची कार्यालयीन कामकाजाची वेळ सोमवार ते शनिवार सकाळी १० ते दुपारी २.३० पर्यंत होती.
- कार्यालय दूरध्वनी क्र. ९५२१२७- २६२८०२
- फॅक्स क्र. ९५२१२७- २६२८०२
- ई-मेल hdn@yahoo.com

प्रभात 19/3/08

चिंतन इमेज मेक